महाराष्ट्र शासन,
संचालनालय, लेखा व कोषागारे,
मुंबई.
महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-३ विभागीय परिक्षा २०२१
(फक्त लेखाधिकाऱ्यांकरिता)
वेळा पत्रक

परिक्षेचा भाग	वार व दिनांक	वेळ	पेपर क्रमांक व विषय
भाग - १	सोमवार दिनांक २३ ऑगस्ट २०२१	सकाळी १०.०० ते १.००	पेपर क्रमांक १ - महाराष्ट्र सिव्हिल सर्व्हिसेस रुल्स,खंड १ व२ वगैरेवरील श्नपत्रिका(सैधांतिक) (पुस्तकांसह)
		दुपारी २.३० ते ५.३०	पेपर क्रमांक २ - महाराष्ट्र सिव्हिल सर्व्हिसेस रुल्स ,खंड १ व२ वगैरेवरील प्रश्नपत्रिका (व्यवहारीक) (पुस्तकांसह)
	मंगळवार दिनांक २४ ऑगस्ट २०२१	सकाळी १०.०० ते १.००	पेपर क्रमांक ३ - बॉम्बे फायनान्शियल रुल्स, महाराष्ट्र ट्रेझरी रुल्स वगैरे (पुस्तकांसह)
		दुपारी २.३० ते ५.३०	पेपर क्रमांक ४ - अकाऊंन्ट कोड, खंड १,२, व ४ वगैरे (पुस्तकांसह)
भाग - २	बुधवार दिनांक २५ ऑगस्ट २०२१	सकाळी १०.०० ते १.००	पेपर क्रमांक ५ - प्रेसी आणि ड्राफ्ट वरील प्रश्न (पुस्तकांशिवाय)
		दुपारी २.३० ते ५.३०	पेपर क्रमांक ६ - बुक-किपिंग वरील प्रश्न (पुस्तकांशिवाय)
	गुरूवार दिनांक २६ ऑगस्ट २०२१	सकाळी १०.०० ते १.००	पेपर क्रमांक ७ - महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या ॲक्ट, वगैरे वरील प्रश्न (पुस्तकांसह)
		दुपारी २.३० ते ५.३०	पेपर क्रमांक ८ - इन्ट्रोडक्शन टू इंडियन गव्हर्नमेंट अकाऊन्टस् आणि ऑडिट वगैरे वरील प्रश्न (पुस्तकांशिवाय)

परिक्षा केंद्र

अ.क्र.	परीक्षा केंद्र	परीक्षा केंद्राचा पत्ता
१	पुणे	शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, शिवाजी नगर, पूणे ४११००५

Scanned with CamScanner

वाचा :- १)संचालनालय लेखा व कोषागारे मुंबई, यांच्याकडील परिपत्रक क्रं परीक्षा १७/ महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा विभागीय परीक्षा /२०२१/७०/२०७८/दिनांक- १७.०५.२०२१

२) संचालनालय लेखा व कोषागारे मुंबई, यांच्याकडील परिपत्रक क्रं परीक्षा १७/ महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा विभागीय परीक्षा /२०२१/१०६/२९०९/ दिनांक- १५.०७.२०२१

३)महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. विपधो/२६२०/प्र क्र.१६/ का.१७ दिनांक- ३१.०३.२०२१

सूचना :-

१) एखाद्या विषयात / विषय समुहात मागील परीक्षेस जर सूट मिळाली असेल व त्यामुळे विभागप्रमुखांनी अशा उमेदवारांस संबंधित विषयासाठी / विषय समुहासाठी प्रवेश दिला नसतानाही तो जर त्या विषयास / विषय समुहास पुन्हा परीक्षेस बसला तर पूर्वी मिळालेली सूट रद्द ठरविण्यात येईल.

२) ज्या उमेदवारांना संचालनालयाने परिक्षेस बसण्यास परवानगी दिली आहे त्यांना त्यांचे वरिष्ठांमार्फत परिक्षा प्रवेशपत्र (सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयामार्फत) व उमेदवारांना सूचनांची प्रत देण्यात येईल. प्रवेशपत्र तसेच ओळखपत्र दाखविल्याशिवाय उमेदवारांना परिक्षा कक्षात व परिक्षेस प्रवेश मिळणार नाही.

३) उत्तरे लिहिण्यासाठी मुख्य उत्तरपुस्तिकेव्यतिरीक्त पुरवणी म्हणून अन्य उत्तरपुस्तिका उपलब्ध करुन दिली जाणार नाही.

४) उमेदवारांनी अनधिकृत कागदपत्रे व पुस्तके व इतर वस्तू जवळ न वाळगणे :- ज्या प्रश्नपत्रिकाची उत्तरे पुस्तकांच्या सहाय्याने लिहावयाची आहेत अशा प्रश्नपत्रिकांचे वेळी उमेदवारांनी विभागाने अधिकृत केलेली (सोबतच्या यादीत नमूद केलेली) व त्यांची स्वत:ची (यथास्थिती केवळ बेअर ॲक्टस आणि (किंवा रुल्स) आणून वापरावीत. परंतु परीक्षेसाठी असलेल्या कोणत्याही प्रश्नपत्रिके वरील टिपण्या असलेली पुस्तके, मार्गदर्शिका व खाजगी प्रकाशनांची पुस्तके वापरण्यास सक्त मनाई आहे. या खेरीज पेजर, मोबाईल, इअर फोन इत्यादी संपर्काची साधने परीक्षा कक्षात आणण्यास व वापरण्यास तसेच प्रोगामेबल कॅलक्युलेटर वा इतर वस्तू परीक्षा कक्षामध्ये आणण्याची उमेदवारांना सक्त मनाई आहे. असे अनधिकृत साहित्य उमेदवाराजवळ सापडल्यास ते नक्कल करण्याच्या उददेशाने जवळ वाळगला असे समजण्यात येईल. सदर सूचनेचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास ती वाव शिस्तभंग असल्याचे समजण्यात येईल व लेखा व कोषागारे, संचालनामार्फत तसेच विभागामार्फत कारवाई केली जाईल. उमेदवारांना लेखा व कोषागारे, संचालनाकडून कोणतीही पुस्तके पुरविली जाणार नाहीत.

५) परिक्षेच्या नियमामध्ये प्रमाणित केल्याप्रमाणे उमेदवारांना प्रश्नाची उत्तरे इंग्रजीत किंवा मराठीत लिहिण्याची मुभा आहे. परंतू उत्तरपुस्तिकेत ज्या भाषेत उत्तरे लिहिणे सुरु केले असेल त्याच भाषेत शेवटपर्यंत उत्तरे लिहिली पाहिजेत. परिक्षेच्या प्रश्नपत्रिका मराठी व इंग्रजी भाषेतच काढल्या जातील.

६) सदर परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांमध्ये काही दोष आढळल्यास त्या संबधीचे लेखी निवेदन उमेदवाराने संचालक, लेखा व कोषागारे, यांच्याकडे स्वत:च्या तपशीलासह

Scanned with CamScanner

टपालाने परीक्षेच्या दिनांकापासून आठ दिवसाच्या आत विभाग प्रमुखाच्या मार्फत सादर करावे तदनंतर आलेली निवेदन विचारात घेतली जाणार नाही. या दोषाबाबत पर्यवेक्षक / समवेक्षक यांच्याकडे विचारणा किंवा चर्चा करु नये.

७) परीक्षेचा निकाल घोषित झाल्यावर गुणांची फेरतपासणी करण्यासाठी प्रत्येक विषयाच्या उत्तरपुस्तिकेचे फेरतपासणी शुल्क रुपये १००/- आहे. ते कोर्ट फी स्टॅम्प स्वरुपात को-या पानावर चिकटवून फेरतपासणी करावयाच्या विषय क्रमांक, विषय नमूद करुन विभाग प्रमुखांना अर्ज करावा. विविध कालावधीत उमेदवारांकडून प्राप्त होणारे सर्व फेरतपासणीचे अर्ज विभाग प्रमुखांमार्फत निकाल प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत आयोगाकडे पाठवावेत. विभागप्रमुखांमार्फत आलेल्या विनंती अर्जाचाच विचार केला जाईल.

८) उत्तरपुस्तिकेतील उत्तरांचे पुन:मुल्यांकन करण्यात येणार नाही.

९) परीक्षेत अनधिकृत साहित्या आधारे नक्कल करण्यास किंवा दुस-या उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेवरुन नक्कल करण्यास वा दुसऱ्या उमेदवाराकडून नियमबाह्य मदत घेण्यास किंवा दुस-या उमेदवाराला नियमबाह्य मदत देण्यास अथवा तसा प्रयत्न करण्यास अथवा वारंवार आपल्या जागेवरुन उठण्यास सक्त मनाई आहे. खाजगी प्रकाशनाची पुस्तके वापरल्यास या सूचनेचे उल्लंघन करणारा उमेदवार शिस्तभंग तरतुदी अन्वये कारवाईस पात्र ठरेल.

१०) संचालनालयाची उत्तर पुस्तिका ही संचालनालयाची मालमत्ता असून ती अनधिकृतरित्या हाताळणे व स्वत:जवळ बाळगणारी व्यक्ती कारवाईस पात्र ठरेल.

११) संचालनालयाने विभागीय परीक्षेसंदर्भाने केलेल्या सर्व सूचनांचे उमेदवाराने अत्यंत काळजीपूर्वक पालन करावे. सूचनांचे पालन न करणारा उमेदवार परीक्षा कक्षाबाहेर घालवून देणे, गुण वजा करणे, पुढील परीक्षांना प्रतिरोधित करणे, उमेदवारी रदद करणे, इत्यादी शिक्षा देण्यास पात्र ठरेल. शिक्षा देण्याचा अधिकार सर्वस्वी संचालनालयाचा राहील.

१२) महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा विभागीय परिक्षेला बसलेल्या अधिकाऱ्यालाय या परिक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी दोन्ही भागांच्या म्हणजेच (भाग -१ व भाग -२)प्रत्येक विषयात एकूण गुणांच्या ५० टक्के गुण हे परीक्षेत उत्तीर्ण होण्याचे मानक असेल.

ठिकाण :- मुंबई
दिनांक :- 22/08/2022

संचालक
लेखा व कोषागारे, मुंबई

Scanned with CamScanner

प्रवेश पत्र

श्री/श्रीमती/कुमारी----------
यांना संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्या मार्फत-दि.२३/०८/२०२१ ते दि.२६/०८/२०२१ मध्ये घेण्यात येणा-या महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-३ विभागीय परीक्षेसाठी (केवळ लेखा अधिकाऱ्यांसाठी) बसण्यास प्रवेश देण्यात येत आहे. त्यांची साक्षांकित स्वाक्षरी खाली देण्यात आली आहे.

पूर्वी----------मधे झालेल्या परीक्षेत पेपर / समुह क्रमांक ---------- मध्ये मिळालेल्या सुटीचा लाभ त्यांना देण्यात येत आहे.

उमेदवाराचा परीक्षेतील बैठक क्रमांक ---------- आहे.

उमेदवारांसाठी असलेल्या सुचना व मार्गदर्शिका त्यांनी काळजीपुर्वक वाचाव्या व त्यांचे काटेकोरपणे पालन करावे.

परीक्षेला प्रवेश मिळण्यासाठी हे प्रवेश पत्र दररोज परीक्षागृहात आणावे. प्रवेशपत्र दाखविल्याशिवाय परीक्षेला प्रवेश मिळणार नाही.

उमेदवाराची स्वाक्षरी

साक्षांकित करणा-या अधिका-याची सही व हुददा

(अधिका-याची सही व हुददा)

Scanned with CamScanner